'शिक्षक', 'पदवीधर' निवडणुकीत महायुतीची सरशी होणार

एक्झिट पोलनुसार डॉ. स्मिता जाधव बाजी मारणार? मविआला एकच जागा मिळणार

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्रातील शिक्षक व पदवीधर मतदारसंघांतील पाच जागांच्या निवडणुकीचा अंदाज 'साम टीव्ही'च्या एक्झिट पोलने वर्तवला आहे. त्यानुसार पाच जागांपैकी महायुतीला तब्बल चार जागांवर विजयाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यामध्ये भारतीय जनता पक्षाला दोन, शिवसेना (शिंदे गट) पक्षाला एक आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाला एक जागा मिळण्याचा अंदाज वर्तवला गेला आहे. तर दुसरीकडे, महाविकास आघाडीला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

एक्झिट पोलनुसार भाजपचे पारडे जड असल्याचे समोर आले आहे. पुणे पदवीधर मतदारसंघात भाजप महायुतीच्या उमेदवार डॉ. स्मिता जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख यांच्यात थेट लढत झाली. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार डॉ. स्मिता जाधव या संभाव्य आमदार ठरण्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. या मतदारसंघात एकूण सुमारे ३ लाख ८८ हजार मतदार असून, दोन्ही प्रमुख उमेदवार उच्चशिक्षित महिला असल्याने या लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या काही दिवसांत भाजपने पुणे विभागासह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात राबवलेली आक्रमक प्रचार रणनीती, मजबूत संघटनात्मक ताकद आणि 'मॅन टू मॅन' नेटवर्क यामुळे भाजपला ही आघाडी मिळताना दिसत आहे. दुसऱ्या बाजूला शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली हर्षदा देशमुख यांनीही आव्हान उभे केले असले, तरी सद्य:स्थितीत भाजपची बाजू वरचढ ठरत असल्याचे राजकीय विश्लेषणातून स्पष्ट होत आहे.

अमरावती शिक्षक मतदारसंघातील चुरशीच्या निवडणुकीत महायुतीला धक्का बसण्याची शक्यता असून, एक्झिट पोलनुसार काँग्रेसच्या आदिती पोहरे या संभाव्य आमदार ठरण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महायुतीकडून ही जागा शिवसेना (शिंदे गट) पक्षाला सुटली होती आणि किरण सरनाईक हे अधिकृत उमेदवार होते; मात्र भाजप व शिंदे सेनेतील अंतर्गत बंडखोरीमुळे सरनाईक यांच्यासमोर चार बंडखोरांचे कडवे आव्हान उभे राहिले.

पुणे शिक्षक मतदारसंघात शिवसेना पुरस्कृत उमेदवार सचिन सानप विजयाचे दावेदार मानले जात आहेत. तर, छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे सतीश चव्हाण आपली पकड कायम ठेवत पुन्हा बाजी मारण्याची शक्यता आहे.

बेकायदेशीर अटक पोलीस आणि दंडाधिकाऱ्याला भोवली

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

मुंबईतील पुनर्विकासाच्या वादात विकासकाशी हातमिळवणी करून पोलीस यंत्रणेचा धाक दाखवून व्यावसायिकाला खंडणीच्या खोट्या गुन्ह्यात अडकवणे पोलीस उपनिरीक्षक आणि दंडाधिकाऱ्यांना चांगलेच भोवले. न्या. अजय गडकरी यांना न्या. कमल खाता यांच्या खंडपीठाने व्यावसायिक विपिन अग्रवाल यांना २६ दिवस बेकायदेशीर अटकेत ठेवल्याबद्दल पोलिसांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले आहेत.

संबंधित पोलीस उपनिरीक्षकासह जबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याचे, व्यावसायिक बिपिन अग्रवाल यांना पाच लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश राज्य सरकारला दिले.

वाळकेश्वर येथील पुनर्विकासाधीन फ्लॅटच्या विक्रीसंदर्भात बिपिन अग्रवाल यांच्याकडे त्यांच्या सासूचे मुखत्यारपत्र असल्याने त्यांनी विकासकांशी व्यवहाराबाबत चर्चा केली. एक कोटी ६४ लाख रुपयांचा विक्रीव्यवहार ठरला. त्यानुसार विकासकांनी आगाऊ रक्कम म्हणून दोन लाख रुपये दिले. त्याच वेळी पोलिसांनी तेथे प्रवेश करून अग्रवाल यांना अटक केली आणि विकासकाच्या तक्रारीवरून खंडणीचा गुन्हा दाखल केला.दंडाधिकाऱ्यांनी पोलीस कोठडीत रवानगी केली.

या अटकेच्या विरोधात अग्रवाल यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने याचिकेची गंभीर दखल घेत पोलिसांच्या कृतीचा पर्दाफाश केला. आवाजाच्या नमुन्याची तपासणी एकाच दिवशी पूर्ण होणे, न्यायवैद्यक अहवाल आरोपपत्रासोबत न जोडणे आणि आवश्यक कागदपत्रे सत्र न्यायालयाला सादर न करणे यावर खंडपीठाने प्रश्न उपस्थित केले.

तसेच विकासकाच्या हितासाठी पोलीस यंत्रणेचा गैरवापर करून व्यावसायिक बिपिन अग्रवाल यांना खंडणीच्या खोट्या गुन्ह्यात अडकवल्याचे गंभीर निरीक्षण नोंदवित पोलिसांच्या कारभारावर कठोर शब्दांत ताशेरे ओढले. खंडपीठाने अग्रवाल यांची ४ ऑगस्ट २०१७ रोजी झालेली अटक बेकायदा ठरवून त्यांना पाच लाख रुपयांची भरपाई दोन आठवड्यांत देण्याचे आदेश राज्य सरकारला दिले. तसेच संबंधित पोलिस उपनिरीक्षकासह जबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याचे आणि दंडाधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याचेही आदेश सरकारला दिले आहेत.

केंद्रीय अन्न सुरक्षा नियमांविरोधात याचिका

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

केंद्र सरकार आणि भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने (एफएसएसएआय) लागू केलेल्या विविध अन्न सुरक्षा नियमांविरोधात राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. राज्याच्या अन्न सुरक्षा आयुक्तांमार्फत दाखल केलेल्या या याचिकेची शुक्रवारी मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत शेठना यांच्या खंडपीठाने दखल घेत याचिकेची सुनावणी पुढील आठवड्यात घेण्याचे निश्चित केले.

केंद्र सरकार आणि अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाने या कायद्यात वेळोवेळी विविध दुरुस्त्या करून बेकायदेशीरपणे एक समांतर अंमलबजावणी व्यवस्था तयार करून राज्य सरकारच्या वैधानिक अधिकारांवर गदा आणली आहे. एफएसएसएआयच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी (सीईओ) कायद्याच्या वैधानिक चौकटीत नसतानाही 'केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी' आणि 'केंद्रीय परवाना प्राधिकरण' यांसारखी पदे निर्माण करून ही विकेंद्रित व्यवस्था टप्प्याटप्प्याने मोडीत काढल्याचा आरोप याचिकेत केला आहे.

असंविधानिक सुधारणा व नियम रद्द करा तसेच केंद्रीय परवानाधारक युनिट्सची तपासणी करण्यापासून राज्य अधिकाऱ्यांना रोखणाऱ्या मे २०२३ च्या आदेशाला स्थगिती द्यावी अशी विनंतीही केली आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

ई-निविदा सूचना क्र. १३४६४५९ सन २०२६-२०२७

अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजने वरील मुळानगर पंपींग स्टेशन येथे ७२५ एच.पी. नवीन मोटार व पंपसेट बसविणे या कामाची निविदा महानगरपालिका अहिल्यानगरकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रु. ३.४५ कोटी असून या कामासंबंधीच्या सविस्तर तपशिल https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
आयुक्त
अहिल्यानगर महानगरपालिका

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई (राष्ट्रीय महत्वाचा बाजार)

मुख्य कार्यालय, प्रशासकीय इमारत, सेक्टर १८, वाशी, नवी मुंबई - ४००७०३
दूरध्वनी क्र.: ०२२ - २७८८८४१४ बाह्य.७९ ई-मेल: infoit@mumbaiapmc.org

ई-निविदा सूचना

एमएपीएमसी, मुंबई (एनआयसी) ई-निविदा आमंत्रित करते

१. मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई (राष्ट्रीय महत्वाचा बाजार) मधील कागदपत्रांचे स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणे व त्याकरिता डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टीम प्रणालीसाठी देकार (Request for praposal) मागविणे.
२. बाजार समितीच्या विविध बाजार आवारात FasTag प्रणाली स्थापित करण्याकरिता आय.पी.बेस्ट आरएफ आयडी आणि एएनपीआर युक्त स्वयंचलीत बुम बॅरिअर व वापराकरिता प्रणालीचा पुरवठा करणेबाबत.

अधिक तपशील वेबसाइटवर उपलब्ध आहेत. : http://www.mumbaiapmc.org/
सादर करण्याची अंतिम तारीख: ०३/११/२०२६ दुपारी ३:०० वाजेपर्यंत

सचिव
मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई
(राष्ट्रीय महत्वाचा बाजार)

SBI
भारतीय स्टेट बँक

सार्वजनिक सूचना: भारतीय स्टेट बँकेच्या निष्क्रिय बचत बँक (नियमित) खातेधारक

ही सूचना अशा बचत बँक (नियमित) खातेधारकांसाठी आहे, ज्यांची खाती गेल्या दोन वर्षात त्यांचे खाते व्यवहार न केल्यामुळे 'निष्क्रिय' झाली आहेत.

त्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे केवायसी कागदपत्रांसह एसबीआयच्या कोणत्याही शाखेत संपर्क साधावा किंवा त्यांचे केवायसी अपडेट करण्यासाठी इंटरनेट बँकिंग/योनो मोबाईल ॲप/एटीएम/व्हॉट्सॲप बँकिंग इत्यादी डिजिटल चॅनेलचा वापर करावा.

1 वर्षापेक्षा जास्त काळ शून्य शिल्लक असलेली अशी निष्क्रिय खाती जर त्यांचे केवायसी एका महिन्याच्या आत अपडेट केले नाही तर या सूचनेनंतर एक महिन्यानंतर कोणतीही सूचना न देता बंद केली जातील.

भारतीय स्टेट बँक
दिनांक: 24.10.2026

सूचना

प्राइम सिक्युरिटीज लिमिटेड
(सी.आय.एन.: एल६७१२०एमएच१९८२पीएलसी०२६७२४)
नोंदणीकृत कार्यालय: ११०९/१११०, मेकर चेंबर ५, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१
दू.: +९१-२२-६१८४२५२५ फॅक्स: +९१-२२-२४९७०७७७ वेबसाईट: www.primesec.com ईमेल: prime@primesec.com

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सेबी परिपत्रक सेबी/एचओ/एमआयआरएसडी/डीओएस३/सीआयआर/पी/२०१८/१३९, दिनांक ६ नोव्हेंबर २०१८, सेबी परिपत्रक सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७, दिनांक २ जुलै, २०२५ आणि सेबी परिपत्रक एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६, दिनांक ३० जानेवारी, २०२६ च्या अनुषंगाने, सुरक्षा धारक/धारकांच्या नावावर असलेल्या सिक्युरिटीज प्रस्तावित हस्तांतरित (ट्रान्सफर) व्यक्तीच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी कंपनीला खालील तपशिलानुसार विनंत्या प्राप्त झाल्या आहेत. या सिक्युरिटीज त्यांच्याद्वारे खरेदी केल्या गेल्याचा दावा केला गेला होता आणि त्या त्यांच्या नावे हस्तांतरित केल्या जाऊ शकल्या नव्हत्या.

अ. क्र.	फोलिओ क्र.	सिक्युरिटीचा प्रकार आणि दर्शनी मूल्य	धारकाचे नाव	धारकाचा नोंदणीकृत पत्ता	शेअर्सची संख्या	विशिष्ट क्रमांक	प्रस्तावित हस्तांतरिताचे नाव	प्रस्तावित हस्तांतरिताचा पत्ता
१.	के०३००२	५/- रुपये दर्शनी मूल्याचे इक्विटी शेअर्स	के. व्ही. सुब्बा राव	६-३-८६२/२/१ ग्रीन लँड्स, नीरज पब्लिक स्कूलसमोर, अमीरपेट बेगमपेट, हैदराबाद ५०००१६	५,०००	११२१०२६ ते ११२६०२५	के. व्ही. सुब्बा राव	६-३-८६२/२/१ ग्रीन लँड्स, नीरज पब्लिक स्कूलसमोर, अमीरपेट बेगमपेट, हैदराबाद ५०००१६

वरील सिक्युरिटीजच्या संदर्भात ज्या कोणत्याही व्यक्तीचा दावा असेल, त्यांनी या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत योग्य कागदोपत्री पुराव्यांसह त्यांचा दावा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात नोंदवावा, अन्यथा कंपनी कोणतीही पूर्वसूचना न देता हस्तांतरित व्यक्तीच्या बाजूने सिक्युरिटीज हस्तांतरित करण्याची कार्यवाही करेल.

प्राइम सिक्युरिटीज लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
अजय शाह
कंपनी सचिव
(एसीएस-१४३५९)

मुंबई
२३ ऑक्टोबर, २०२६

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES OFFICE OF DEVELOPMENT COMMISSIONER (MSME), NEW DELHI

Invites Application for the post of CEOs in Autonomous Bodies

Government of India is looking for energetic, result oriented dynamic & talented professionals having domain knowledge, skill sets & leadership qualities, who wish to leverage their experience & knowledge to deliver high results in the respective sector.

1. **General Manager, Central Tool Room & Training Centre (CTTC), Kolkata**
2. **Principal Director, Fragrance & Flavour Development Centre (FFDC), Kannauj**
3. **Principal Director, Centre for Development of Glass Industry (CDGI), Firozabad**
4. **Director, Central Footwear Training Institute (CFTI), Agra**
5. **General Manager, Central Tool Room & Training Centre (CTTC), Bhubaneswar**
6. **Principal Director, Central Institute of Hand Tools (CIHT), Jalandhar**
7. **General Manager, Central Tool Room (CTR), Ludhiana**

To be filled on **contract basis** for a period of **5 years** initially with further extension, based on the review of performance till the age of superannuation.

For eligibility criteria along with Application Proforma-Go through detailed advertisement available on website-**www.dcmsme.gov.in, www.ffdcindia.org, www.cftiagra.org.in, www.cdgiindia.net, www.cttc.gov.in, www.ciht. in, www.msmetoolroomkolkata.com, www.ctrludhiana.org.**

Duly filled Application along with supporting documents should reach by speed/registered post only at the following address-**Additional Development Commissioner (TR), Office of the Development Commissioner (MSME), Room No. 32082, 2nd Floor, Kartavya Bhawan-3, Janpath Road, New Delhi-110001**

(Separate applications should be sent for separate post/locations. The envelope containing the application must be superscripted with application for the vacancy of respective position/location applied. for .....)

The last date of receipt of application is **23.11.2026.**

cbc 25113/11/0054/2627

धारावी पुनर्विकास प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/धापुप्र/स.प्रा.२/४७६८/२०२६
दिनांक : ०१.१०.२०२६

सार्वजनिक सूचना

विषय : धारावी पुनर्विकास प्रकल्प अंतर्गत मुंबई शहरी परिवहन प्रकल्प (MUTP) - ५ वी व ६वी रेल्वे मार्गिकेमुळे प्रभावित झोपडपट्टीच्या झोपड्यांच्या/व्यापाऱ्यांच्या पुनर्वसन पात्रता निश्चितीसाठी कागदपत्रे सादर करणेबाबत.

संबंधित सर्वांस असे कळविण्यात येते की, मुंबई शहरी परिवहन प्रकल्प (MUTP) अंतर्गत ५वी व ६वी रेल्वे मार्गिकेमुळे प्रभावित होणाऱ्या आणि धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कक्षेत येणाऱ्या झोपडपट्टीतील झोपडीधारकांची / व्यापाऱ्यांची पुनर्वसन पात्रता, राज्य शासनाच्या दिनांक १६.०५.२०१५, १६.०५.२०१८ च्या शासन निर्णयानुसार (तळमजल्यावरील झोपड्यांसाठी) तसेच दिनांक ०४.१०.२०२४ च्या शासन निर्णयानुसार (वरच्या मजल्यावरील झोपड्यांसाठी) निश्चित केली जाणार आहे.

अ) तळमजल्यावरील झोपडीधारकांसाठी - (शासन निर्णय क्रमांक झोपुयो १००१/प्र.क्र.१२५/१४/ झोपसु १, दिनांक १६.०५.२०१५ व शासन निर्णय क्रमांक झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/ झोपसु-१, दिनांक १६.०५.२०१८):

झोपडीधारकाच्या नावासह व झोपडी क्रमांकाचा अथवा निश्चित स्थानाचा (उदा. चाळ, रस्ता, निवासी पत्ता इ.) उल्लेख असलेला १.१.२००० रोजी किंवा त्यापूर्वीचा पुरावा दर्शविणारी खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र सादर करावे :

१) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत इ.स. २००० सालातील किंवा त्यापूर्वीच्या काळात प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीचा प्रमाणित उतारा; **किंवा**
२) अधिकृत वीज कंपनीने त्या झोपडीस दिलेल्या वीज जोडणीची कागदपत्रे/नोंदी/बिले; **किंवा**
३) दिनांक ११ जुलै २००१ च्या आदेशाच्या संदर्भात राबविलेल्या पात्र झोपडीधारकांसाठी ओळखपत्र योजना, २००१ अंतर्गत राज्य शासनाने दिलेले गणना फॉर्म (Enumeration Form); **किंवा**
४) महापालिका/नगर परिषदेकडून झोपडीच्या मालमत्ता कराचे आकारणी झाल्याचा पुरावा; **किंवा**
५) राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून प्राप्त बिगर कृषी परवानगी किंवा बिगर कृषी वापर वैधीकरणाची परवानगी व तत्कालीन बिगर कृषी कर / दंड भरल्याची पावती; **किंवा**
६) १.१.२००० रोजी किंवा त्यापूर्वी नोंदणीकृत झोपडपट्टी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून प्रमाणित शेअर प्रमाणपत्र **किंवा**
७) व्यावसायिक/औद्योगिक स्वरूपाच्या वापराच्या अथवा निवासी वापरासह मिश्र वापराच्या झोपडीसाठी - १.१.२००० रोजी किंवा त्यापूर्वी महापालिका/नगर परिषदेकडून प्राप्त, झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेला अथवा निश्चित स्थान दर्शविणारा **(अ)** गुमास्ता (दुकान व आस्थापना) परवाना किंवा मेस परवाना **(ब)** रेस्टॉरंट परवाना/संबंधित कर भरल्याची पावती.

ब) वरच्या मजल्यावरील झोपडीधारकांसाठी शासन निर्णय क्र. धापुप्र-२०२४/प्र.क्र.५३/ झोपसु, दिनांक ०४.१०.२०२४)

दिनांक ०४.१०.२०२४ च्या शासन निर्णयानुसार, १५ नोव्हेंबर २०२२ पर्यंत धारावीत वास्तव्यास असलेले वरच्या मजल्यावरील निवासी झोपडीधारक भाडेपट्टा योजनेअंतर्गत पुनर्वसनास पात्र आहेत. यांनी झोपडपट्टीची पडताळणी व कुटुंबप्रमुखाची ओळख पटविण्यासाठी खालील कागदपत्रे प्राधान्यक्रमाने सादर करावीत :

प्राधान्य १: कुटुंबप्रमुखाच्या नावावर असलेले व वरच्या मजल्याचा उल्लेख असलेले वीज बिल (पात्रता निश्चिती तारखेपूर्वीचे एक व अलीकडील एक असे दोन्ही बिल).

प्राधान्य २: वरच्या मजल्याचा उल्लेख असलेला नोंदणीकृत भाडे करार (किमान एक करार पात्रता निश्चिती तारखेपूर्वीचा व दुसरा अलीकडील / नवीनतम).

प्राधान्य ३: वरच्या मजल्याचा उल्लेख असलेला नोंदणीकृत खरेदी करार व नोटरीकृत संमतीपत्र (सर्व मालकांसाठी; किमान एक करार पात्रता निश्चिती तारखेपूर्वीचा व अलीकडील खरेदी करारासह).

प्राधान्य ४: वरच्या मजल्यावरील पत्त्याचा उल्लेख असलेले आधार कार्ड, पासपोर्ट, रेशन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा मतदार ओळखपत्र.

प्राधान्य ५: तळमजल्यावरील झोपडीतील कुटुंबप्रमुख (किंवा पात्र कुटुंबप्रमुख) यांच्या प्रमाणपत्रासह, वरच्या मजल्यावर राहणाऱ्या कुटुंबप्रमुखाकडून, माहिती सत्य व अचूक असल्याचे प्रमाणित करणाऱ्या स्वाक्षऱ्यांसहित शपथपत्र / प्रतिज्ञापत्र.

- **Note :-** धारावी अधिसूचित क्षेत्रामधील सेक्टर- २ रेल्वेच्या MUTP प्रकल्पातील (शिवाजी महाराज टर्मिनल ते कुर्ला ५ वी ६ वी मार्गिका) येथील बाधित झोपडीधारकांच्या पात्रतेसंदर्भात कुर्ला येथे **दि. ०७/०९/२०२६** ते **दि.११/०९/२०२६** या कालावधीत शिबिराचे (Camp) आयोजन करण्यात करण्यात आले होते. तरीही काही झोपडीधारकांनी अद्याप पात्रतेसंबंधातील कागदपत्रे अद्याप या कार्यालयाला सादर केलेली नाहीत.

तरीही संबंधितांनी, ही सूचना प्रकाशित झाल्याच्या **तारखेपासून १५ दिवसांच्या आत, कागदपत्रे सादर करण्याची वेळ [सोमवार ते शुक्रवार, सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.००] अशी राहील.**

- **[कार्यालयाचा पत्ता:- ३ रा मजला, गाला अल्टेझा, उदोग नगर, ई प्लॉट क्र १७ ए, फ्लॅक रोड, श्री. षण्मुखानंद नाट्यगृहाजवळ, किंग्ज सर्कल, सायन, मुंबई - ४०००२२]** येथील कार्यालयात स्वयं-प्रमाणित प्रतींच्या स्वरूपात खाली नमूद केलेली कागदपत्रे सादर करावीत.
- असे येथे स्पष्ट कळविण्यात येते की, निर्धारित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास, संबंधित झोपडीधारकाची / व्यापाऱ्याची पात्रता उपलब्ध नोंदी व सदर सूचनेच्या आधारावर निश्चित केली जाईल. पात्रता निश्चितीसंबंधी अंतिम निर्णय सक्षम प्राधिकाराचा राहील.
- संबंधितांनी लवकरात लवकर कागदपत्रे सादर करण्याची विनंती केली आहे.

स्थान : मुंबई
दिनांक : २९/०९/२०२६

सही/-
(स्नेहल रहाटे)
उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, सेक्टर- २
धारावी पुनर्विकास प्रकल्प